Remove Watermark Wondershare PDFelement

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापी[illegible], रसायनशास्त्र प्रशाळा व वुई गो लायब्ररी फाउंडेशन, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या शनिवार दि. ९ सप्टेंबर रोजी “पेटंट” या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते होणार आहे. तसेच या कार्यशाळेत कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळा संचालक डी. एच. मोरे व वुई गो लायब्ररी फाउंडेशनचे निलेश पावसकर यांच्या उपस्थितीत सामजंस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात येणार आहेत.

कार्यशाळेच्या व्याख्यान सत्रात “बिल्डींग पेटंट” या विषयावर स्मिता माने, “इकोसिस्टीम इन इंडीया” या विषयावर निलेश पावसकर व डॉ. निखिल पाठक तसेच “पेटंट फाईलिंग कसे करावे” या विषयावर पराग खेडकर, मोहिनी सुर्यवंशी हे बोलणार आहेत. कोणते पेटंट क्लेम करावे व करू नये या विषयावर रावसाहेब घेगाडे, तसेच पेटंटव्दारे कशी कमाई होऊ शकते या विषयावर आनंद जाधव, श्रीकांत जोशी, निनाद कुलकर्णी हे व्याख्यान देतील. बौध्दिक संपदा अधिकार या विषयावर प्रसाद वाघ, मोहिनी सुर्यवंशी मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यशाळेमुळे संशोधकांना त्यांनी केलेल्या संशोधना संदर्भात पेटंट दाखल करतांना संपूर्ण कार्यवाहीचे मार्गदर्शन प्राप्त होईल. या कार्यशाळेत विद्यार्थी, शिक्षक, संशोधकांनी सहभाग घ्यावा असे कार्यशाळेचे समन्वयक डॉ. विकास गिते यांनी कळविले आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्यविद्या प्रशाळे अंतर्गत असलेल्या मानसशास्त्र विभागाच्यावतीने उद्या शनिवार दि. ९ सप्टेंबर रोजी जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

मानसरंग, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी आणि विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या कार्यक्रमात मनोविकार तज्ज्ञ डॉ. दिलीप महाजन हे मार्गदर्शन करणार आहेत. अशी माहिती प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. राम भावसार व मानसशास्त्राच्या डॉ. वीणा महाजन यांनी दिली.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत प्रवर्तन व विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमात चौथ्या दिवशी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी व्यवस्थापन विकासाविषयी मार्गदर्शन केले.

प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. लेकुरवाळे यांनी व्यक्ती हा पोशाखामुळे नव्हे तर त्याच्यातील कलागुणांमुळे सुंदर होत असतो. त्यामुळे स्वत:वरचा विश्वास वाढावा असे आवाहन त्यांनी केले. प्रा. आर. आर. चव्हाण यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी

Wondershare PDFelement